पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

पुणे महानगरपालिका
सभेचा वृत्तांत ( सभा क्रमांक १५ )
मंगळवार, दिनांक १०/५/२०२२, दुपारी ३.४५ वाजता

पुणे महानगरपालिकेची मासिक (स्थगित) सभा (माहे नोव्हेंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेवरील कामकाजासाठी प्रथम दिनांक १८/११/२०२१ रोजी बोलविलेली) महानगरपालिकेच्या मा.महापालिका आयुक्त कार्यालयातील सभागृहात भरली होती.

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. विक्रम कुमार,भा.प्र.से. | – | प्रशासक तथा महापालिका |
| २) | मा. राजेंद्र मुठे | – | उपायुक्त (दक्षता व मालमत्ता व्यवस्थापन) |
| ३) | मा. श्रीनिवास कंदुल | – | मुख्य अभियंता (विद्युत) |
| ४) | श्री. शिवाजी दौंडकर | – | नगरसचिव |

मा. विक्रम कुमार, भा.प्र.से, महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे मनपा हे सभापती म्हणून अध्यक्षस्थानी होते.

**मा. प्रशासक :** सभा सुरु करावी.

**नगरसचिव :** माहे नोव्हेंबर २०२१ कार्यपत्रिका. मा.सभापती/प्रशासक यांनी विषय घेण्याचे आदेश दिले आहेत.

**विषय क्र. ४९८**

कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत पुणे मनपाच्या विविध रुग्णालये व दवाखाने इ. ठिकाणी अस्तित्वातील अग्निशामक यंत्रणेची दुरूस्ती करणे व नव्याने Fire Extinguisher बसविणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम **६७(३) (क) अन्वये** मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/भवन/ ६१९, दि. २०/०९/२०२१चे पत्र.

**ठराव क्रमांक :– ५३**

**संदर्भ –** **१) मुख्य अग्निशामक अधिकारी, पुणे मनपा यांचे पत्र जा.क्र.१३५,दि.९.४.२०२१**
२) शासननिर्णय महसूल व वनविभाग सीएलएस-२०२०/प्र.क्र.१२३/म-३, दि.१६.३.२०२०.
३) शासनपरिपत्रक वित्त विभाग संकीर्ण -२०२०/प्र.क्र.५९/२०/कोषा.प्रशा-५, दि.१८.३.२०२०.
**४) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/भवन/६१९ दि.२०/९/२०२१ चे पत्र.**
**५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२९७,दि.२६/१०/२०२१**

----

**मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –**

**कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत पुणे मनपाच्या विविध रुग्णालये व दवाखाने इ.ठिकाणी अस्तित्वातील अग्निशामक यंत्रणेची दुरूस्ती करणे व नव्याने Fire Extinguisher** बसविणे हे काम अतितातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम **६७(३) क अन्वये करणेत येत असलेल्या खालील बाबी सादर करणेत आल्याची नोंद घेण्यात येत आहे.**

**)1) कोरोना प्रतिबंधात्मक योजनेअंतर्गत खालील नमूद कामे ठेकेदार मे. वर्ल्ड ऑफ स्प्रिंकलर यांचे कडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये करून घेणेस, त्यासाठी त्यांचेशी करारनामा न करता व सिक्युरिटी डिपॉझीटची रक्कम भरून न घेता त्यांना एकूण र. रु. २९,४६,७९६.००/-(र.रु.एकोणतीस लक्ष सेहचाळीस हजार**

**सातशे शहाण्णव फक्त) ( जीएसटी सह ) चे बिल अॅटपार दरानेअदा करणेस.**

| अ.क्र | कामाचा तपशील | अंदाजीत खर्च र.रू. (जीएसटी सह) |
|---|---|---|
| १ | पुणे महानगरपालिकेच्या नायडू हॉस्पिटल येथील अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करणेसाठी अतितातडीची कामे करणे ( तक्ता अ ) | ८,९८,०२५/- |
| २ | पुणे महानगरपालिकेच्या खेडेकर हॉस्पिटल बोपोडी येथील अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करणेसाठी अतितातडीची कामे करणे ( तक्ता ब ) | ४,२२,४३६/- |
| ३ | पुणे महानगरपालिकेच्या गणेश कला क्रीडा मंच येथील अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करणेसाठी अतितातडीची कामे करणे ( तक्ता क ) | २,६१,४७३/- |
| ४ | पुणे मनपा दवाखाने/हॉस्पिटल/ कोविड केअर सेंटर येथे नवीन Fire extinguisher बसविणे ( तक्ता ड ३९ ठिकाणी ) | ११,०४,२७०/- |
| ५ | पुणे मनपा दवाखाने/हॉस्पिटल/ कोविड केअर सेंटर येथील अस्तित्वातील Fire extinguisher रीफील करणे ( तक्ता इ ७ ठिकाणी ) | २,६०,५९२/- |
| | एकूण खर्च (जीएसटी सह) रु. | २९,४६,७९६/- |

**निर्णय :- विषय क्र. ४९८ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ५७७**

पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. कंपनीचे दर ३ महिन्यांनी दैनंदिन कामकाजाचा अहवाल निदर्शनास आणणेबाबत, मा.मुख्य कार्यकारी अधिकरी, पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.यांचे जाक्र PSCDCL/प्रशासन/९७४/२०२०, दिनांक १९/१०/२०२० चे पत्र.

**ठराव क्रमांक :- ५४**

**संदर्भः- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचे जा. क्र. PSCDCL/प्रशासन/९७४/ २०२०,दि. १९/१०/२०२० चे पत्र.**

----

**पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. कंपनीचे दर ३ महिन्यांनी दैनंदिन कामकाजाचा अहवाल निदर्शनास आणण्यात आल्याची नोंद घेण्यात येत आहे.**

**निर्णय :- विषय क्र. ५७७ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ६०१**

कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये कै.अण्णासाहेब मगर दवाखाना येथे नव्याने तयार करण्यात येणाऱ्या कोविड केअर केंद्राकरीता ऑक्सिजन पाईपलाईन व इतर तद् नुषंगिक कामे करणेबाबत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) मधील तरतुदीच्या अनुषंगाने मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/विद्युत/८०२, दि. ०३/११/२०२१चे पत्र.

**ठराव क्रमांक :- ५५**

**संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/विदयुत/८०२ दि.३/११/२०२१ चे पत्र.**
**२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १४०९ दि. ३/११/२०२१**

---

**मा.महा.आयुक्त यांनी दिलेलीकारणे व केलेली शिफारस विचारातघेवून-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये कै.अण्णासाहेब मगर दवाखाना येथे नव्याने तयार करण्यात येणाऱ्या कोविड केअर केंद्राकरीता ऑक्सिजन पाईपलाईन व मे.स्पार्क इंडस्ट्रीज यांचेकडून इतर तदनुषंगिक कामे करणे हे काम र.रू.१९,४१,१७७ =८८ पर्यंत सन २०२१ – २२ च्या आरोग्य विभागाने उपलब्ध करून दिलेल्या निधीमधून काम करून घेणेस, त्यानुसार त्यांचेशी करार करणेस, झालेल्या कामांचे बिल अदा करणेस व सदरची बाब निदर्शनास आणणेत आल्याची नोंद घेण्यात येत आहे.

निर्णय :– विषय क्र. ६०१ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

मा.सभापती/प्रशासक : आजची सभा गुरुवार, दिनांक १९/५/२०२२ रोजी, सकाळी ११.२० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा तहकुब झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी जाहीर केले.

स्वाक्षरी /–xxx
शिवाजी दौंडकर,
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

*******

दि. १९–०८–२०२२ च्या सभेत वृत्तांत कायम केला.

स्वाक्षरी /–xxx

प्रशासक, पुणे म.न.पा.

**********